# प्रकरण १६

## संकीर्ण

३२७. राज्य सरकार ह्या बाबतीत वेळीवेळी विहित[१०२] करील अशा नियमांस अधीन राहून आणि अशी फी दिल्यावर, सर्व नकाशे आणि जमिनीसंबंधीचे अभिलेख हे, लादण्यात येतील अशा निर्बंधास अधीन राहून, वाजवी वेळात लोकांच्या तपासणीसाठी खुले असतील आणि त्यातील प्रमाणित उतारे किंवा त्याच्या प्रमाणित प्रती या, त्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व इसमांस देण्यात येतील. नकाशे णाणि जमिनी संबधीचे अभिलेख तपासणी इत्यादीसाठी खुले असणे.

**टीप १०२.**—भूमी अभिलेखांच्या प्रतीचे निरीक्षण, शोध व पुरवठा यासंबंधी नियम. (कृपया कलम ७५ खाली ४३-अ व कलम २३९ खालील ९१ या टीपाही पहा).

**भूमि अभिलेखांच्या प्रतींचे निरीक्षण, शोध व पुरवठा यासंबंधीचे नियम :—**

[शासकीय अधिसूचना क्र युएनएफ-२८६७ आर (विशेष) दिनांक २० मे १९७२ याद्वारे सुधारण्याप्रमाणें शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ २८६७ आर, दिनांक ६ जुलै १९७०.]

१. **नाव.**—या नियमांस महाराष्ट्र जमीन महसूल (भूमि अभिलेखांच्या प्रतीचे निरीक्षण, शोध व पुरवठा) नियम, १९७० असे म्हणता येईल.

२. **अभिलेखांचे निरिक्षण.**—ज्यांचे निरीक्षण करण्याच्या अधिकाराची तरतूद महसूल अधिनियमाची कलमे २३९ व ३२७ यांत करण्यात आली आहे, असे दस्तऐवज, योजना, नकाशे, नोंदवह्या, लेखे, भूमि-अभिलेख धरून अभिलेख (यापुढे ज्यांचा "अभिलेख" असा निर्देश करण्यात आला आहे), त्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या परवानगीने, त्याच्या कार्यालयात, रविवार व सार्वजनिक सुट्या सोडून प्रत्येक दिवशी नेहमी-च्या कार्यालयीन वेळेत, यापुढे विहित केलेली फी दिल्यानंतर निरीक्षणासाठी खुले असतील.

३. **निरीक्षणासाठी करावयाचा अर्ज.**— (१) कोणत्याही अभिलेखाचे निरीक्षण करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, स्वतः किंवा तिने मान्यता दिलेल्या अभिकर्त्यामार्फत, अशा अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे अर्ज करील व अशा अर्जात अभिलेखाचा तपशील व ज्या कारणासाठी अभिलेखाच्या निरीक्षणाची मागणी करण्यात आली आहे, ते कारण नमूद करील.

(२) पोट-नियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, अभिलेखांचा प्रभारी अधिकारी, पोट-नियम (३) अन्वये अर्ज नाकारण्यात आला नसेल तर, परवानगी देईल.

(३) ज्यांचे निरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे असे अभिलेख गोपनीय स्वरूपाचे आहेत किंवा ते निरीक्षण लोकहितास बाधक होईल असे अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्यास (तो तलाठी नसेल) वाटेल तर त्यास, निरीक्षणासाठीचा अर्ज नाकारणारा आदेश नोंदविता येईल. आणि तलाठी अशा अभि-लेखांचा प्रभारी असेल त्या बाबतीत, तो असा अर्ज आदेशांकरिता तहसिलदाराकडे पाठविल.

४. **निरीक्षणासाठीची फी**—अभिलेखांच्या निरीक्षणासाठीची फी, यासोबतच्या अनुसूचीत तरतूद केलेल्या दरानुसार आगाऊ रोख देण्यात आली पाहिजे :